# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान चौथा रविवार - ०८ मे २०२२

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू : माझ्या बंधू भगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा विश्वास बाळगू या.

प्रतिसाद : प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना आपल्या कळपाची उत्तम काळजी घेण्यासाठी सामर्थ्य व कृपा लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राज्यकर्त्यांनी सामान्य नागरिकांच्या समस्यांवर मात करण्यासाठी योग्य ते कायदे करावेत व त्या कायद्यांच्या अंमलबजावणीकडे विशेष लक्ष पुरवावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. मेंढरे आपल्या मेंढपाळाची वाणी ऐकतात आणि त्याच्या मागे जातात. सर्व श्रद्धावंतांनी ख्रिस्तसभेशी एकनिष्ठ राहून एक मेंढपाळ व एक कळप ह्या प्रमाणे आध्यात्मिक जीवन जगावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मग्रामातील सर्व मुलगामी व सामाजिक नेत्यांनी उत्तम मेंढपाळ प्रभू येशू ख्रिस्ताप्रमाणे स्वार्थत्यागी वृतीने आपल्या लोकांची सेवा करावी व आपला गावपरिवार ख्रिस्ताला अभिप्रीत असा आदर्श कळप करावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेच्या स्पर्शाचा गरीब, आजारी व निराधार लोकांना अनुभव यावा, कोरोना विषाणु पासून व सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे तसेच आज / उदया विबाहबद्ध होत असलेल्या वधूवरांवर परमेश्वराचा वरदहस्त असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू : हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.